Io साहेब

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** कदीम -जालना **Year (वर्ष):** 2020
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0517 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/11/2020 22:26 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 03/11/2020
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/11/2020
**Time From (वेळेपासून):** 16:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/11/2020 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 058 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/11/2020 22:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 2 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** राहते घर,इंकमटॅक्स कॉलनी,जुना जालना

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** विनोद मुरलीधर राठोड
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | एसआरपीएफ काँटर जवळ,म्हाडा काँलनी जालना,एस बी जालना ,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शंभुसावरगाव, ता जिजालना,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9075579370

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळ आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान प |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीराम सवाईराम राठोड | | | 1. इन्कमटक्स कलनी जालना,कदीम जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs (मुल्य (रु. मध्ये |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 34,500 रुपये अ.पा.लावलेली रोख रक्कम. | 3 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 34,500.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना दिनांक 03.11.2020.मी विनोद मुरलीधर राठोड, वय 34 वर्ष, व्यवसाय नोकरी शिपाई, श्री.तुळजादेवी शिक्षण प्रसारक मंडळ अपंग निवासी विद्यालय, आरटीओ ऑफीस रोड, नागेवाडी शिवार, जालना, मुळ रा.शंभुसावरगाव, ता.जि.जालना, ह.मु. एस.आर.पी.क्कर्टर जवळ महाडा कलनी येथे हिरालाल गौरक्षक यांचे घरी किरायाने.जालना.मो नं. 9075579370. समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी एस.आर.पी.क्कर्टर जवळ महाडा कलनी येथे हिरालाल गौरक्षक यांचे घरी किरायाने कुंटुबासह राहतो व सन 2007 पासुन श्री तुळजादेवी शिक्षण प्रसारक मंडळ अपंग निवासी विद्यालय, आरटीओ ऑफीस रोड, नागेवाडी शिवार, जालना येथे शिपाई म्हणुन नोकरी करतो. या संस्थेचे संस्थापक श्री श्रीराम सवईराम राठोड हे आहेत. मी सदर शाळेवर 2009 पासुन कायमस्वरुपी नेमणुक झाली असुन संस्थेने आमच्या पगाराची बिले समाजकल्याण विभागात जमा केल्यावर तेथुन आमचा पगार हा आमच्या बक खात्यामध्ये जमा होतो. मी लकडाऊनचे काळात माहे एप्रिल मध्ये माझे वडील आजारी असल्यांने व माझे वडील दवाखान्यात उपचार घेत असल्यांने आमच्या शाळेतील मुख्यापक श्री मवाळ साहेब यांचेकडुन तीन दिवसाच्या सुटीचा अर्ज देवुन सुटीवर गेलो होतो. माझ्या वडीलांच्या दोन्ही किडण्या खराब झाल्याचा रिपोर्ट दवाखान्यातुन आल्यानंतर मला वडीलांजवळ दहा दिवस थाबने भाग पडले. याबाबत मी शाळेच्या मुख्याध्यापक यांना सांगुन सुटटी घेतली होती. त्यानंतर मी डयुटीसाठी जेव्हा शाळेवर गेलो तेव्हा मुख्याध्यापक श्री.मवाळ मला म्हणाले की, तु आपल्या संस्थेचे अध्यक्ष श्री.राठोड साहेबांना यांना भेटुन घे. असे म्हणाल्यावरुन मी अध्यक्ष श्री.राठोड यांना त्यांचे घरी इनकम टक्स कलनी, जालना येथे जाऊन भेटलो. तेथे त्यांना भेटलो असता ते मला म्हणाले की, तु सुटटेवर जाताना मला का नाही सागिंतले तु शाळेवर डयुटीसाठी येवु नको, तुझ्या वडीलांची तब्येत चांगली झाल्यावर शाळेत डयुटीसाठी ये असे ते मला म्हणाले व मला चार महिने डयुटीसाठी शाळेवर येऊ दिले नाही. मी दि.25.10.2020 रोजी त्यांना डयुटीवर जईन करुन घेण्यासाठी त्यांचे घरी जाऊन भेटलो तेव्हा त्यांनी मला चार महिन्याच्या पगाराची 72,000/- रु.ची मागणी केली व ते दिले तरच मी तुला शाळेत डयुटीवर घेईन. तेव्हा मी त्यांना माझेजवळ असलेले 26,500/- रु. त्यांचे घरी जाऊन दिले. व डयुटीवर हजर करुन घेण्याची व माझा पगार काढण्यासाठी अध्यक्ष श्री राठोड साहेब यांना विंनती केली असता त्यांनी मला शाळेवर रुजु करुन घेतले. व हजेरी मस्टरवर सर्व दिवशांचा सहया करुन घेतल्या व सागिंतले कि, तुझे जुलै ते सप्टेबर असे तीन महिन्याचा पगार मुख्याध्यापक यांना काढण्यास सांगतो व त्यांतील मला एका महिन्याचे 11,500 रु याप्रमाणे तीन महीन्याच्या पगारातील 34,500/- रु. ची मागणी करुन देण्यास सागिंतले ते दिले नाहीतर तुझा इथुन पुढचा पगार काढणार नाही व तुला डयुटीसाठी शाळेवर येऊ देणार नाही असे सांगीतले तेव्हा मी त्यांना नाविलाजाने माझा तीन महिन्याचा पगार माझ्या बक खात्यावर टाकण्यासाठी व मला डयुटीवर रुजु करुन घेण्यासाठी 34,500/- रुपये आणुन देतो असे म्हणालो व तेथुन निघुन आलो. त्यानंतर दि.30.10.2020 रोजी माझा तिन महिन्याचा पगार एस बी आय बक खात्यात जमा झाला



Scanned with CamScanner

असता याबाबतची माहिती आमच्या शाळेचे संस्थापक श्री राठोड यांना कळली असता त्यांनी दि.31.10.2020 रोजी त्यांचे घरी बोलावुन मासातील 34,500/- रुपये आणुन देण्याबाबत मागणी केली तसेच ते मला माझ्या फोनवर वारंवार फोन करुन पैसे आणुन देण्याबाबत सांगत आहेत.मला आमचे शाळेचे अध्यक्ष श्री. श्रीराम सवाईराम राठोड हे माझा इथुन पुढचा पगार जमा करण्याची तसेच शाळेवर डयुटी करण्यासाठी जी लाच मागत आहे. त्यांना ती लाच दयायची माझी इच्छा नाही, परंतु जर त्यांना लाच दिली नाही, तर ते माझा इथुन पुढचा पगार माझ्या बँक खातेवर टाकणार नाही व मला शाळेमध्ये डयुटीवर काम करुन देणार नाहीत. आमचे शाळेचे अध्यक्ष श्री.श्रीराम राठोड यांचेशी माझी वैयक्तीक दुश्मनी नाही, अगर देण्या घेण्याचा अथवा उसनवारीचा आर्थीक व्यवहार नाही. अध्यक्ष श्री.श्रीराम राठोड हे माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्याचे मला माहित आहे. मी आज दिनांक 03.11.2020 रोजी इनकम टक्स कलनी, जालना येथील श्री.श्रीराम राठोड यांचे राहते घरी त्यांना भेटण्यासाठी जाणार असुन तेथे त्यांना इथुन पुढचा पगार काढण्याबाबत व मला शाळेमध्ये काम करु देण्याची विनंती करणार आहे. त्यावेळी त्यांनी मला लाचेची मागणी करुन ते स्वत: किंवा इतरामार्फत स्विकारल्यास त्यांना पकडुन कार्यवाही करावी.वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.माझ्या तक्रारी वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब यांनी मला दोन पंच व सापळा पथक यांच्यासोबत ओळख करुन देवुन, आमचे शाळेचे अध्यक्ष श्री श्रीराम राठोड यांची पंचासमक्ष प्रत्यक्ष भेट घेवून व्हाईस रेकर्डरच्या सहाय्याने अध्यक्ष श्री.श्रीराम राठोड यांची लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे पंच क्रं.1 श्री. सचिन शिंदे यांचे सह माझ्याकडे व्हाईस रेकर्डर सुरु करुन देवून इनकम टक्स कलनी, जालना येथील श्री.श्रीराम राठोड यांचे राहते घरी येथे त्यांना भेटण्यासाठी पाठवेले असता तेथे त्यांची भेट झाली. सदर भेटीमध्ये अध्यक्ष श्री श्रीरान राठोड यांनी माझ्याकडे माझा इथुन पुढचा पगार काढण्याबाबत व मला शाळेमध्ये काम करण्यासाठी 34,500/- रु. दयावे लागेल असे पंचासमक्ष 34,500/-रुपयाची लाचेची मागणी करुन 34,500/-रुपये स्विकारण्यास तयार असल्याचे निष्पन्न झाले.त्यावरुन आज दि.03.11.2020 रोजी इनकम टक्स कलनी, जालना येथील श्री.श्रीराम राठोड यांचे राहते घरी त्यांचे विरुध्द सापळा लावण्याचे ठरवुन मोतीबाग, जालना समोरील ग्रंथालय परिसरात सुरक्षीत ठिकाणी मला व पंचांना अल्ट्राव्हाईलेट लम्प व अंथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन त्याबाबत माहीती देवुन त्याचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. मी हजर केलेले 34,500/-रुपये अध्यक्ष श्री.श्रीराम राठोड यांना लाच म्हणुन देण्यासाठी काढून त्यां नोटांना अंथ्रासीन पावडर लावुन माझ्या पँटच्या उजव्या बाजुचे खिशात ठेवले. मला व दोन्ही पंचाना सुचना दिल्या.त्यानंतर मला व पंच श्री. सचिन शिंदे यांना इनकम टक्स कलनी, जालना येथील श्री. श्रीराम राठोड यांचे राहते घरी त्यांना भेटण्याठी पाठविण्यात आले व त्या ठिकाणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना कार्यालयातील कर्मचारी यांचेसह सापळा लावण्यात आला. सापळ्याचे वेळी अध्यक्ष श्री.श्रीराम राठोड यांनी 16.00 वाजे दरम्यान माझ्या कडुन इनकम टक्स कलनी, जालना येथील त्यांचे राहते घरी पंच साक्षीदार श्री.सचिन शिंदे यांचे समक्ष माझ्याकडून माझा इथुन पुढचा पगार काढण्याबाबत व मी शाळेमध्ये काम करण्यासाठी 34,500/- रुपयाची लाच स्विकारली. त्यानंतर मी सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला असता पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब व स्टाफ तसेच पंच नं.2.श्री. महेश डाहोरे असे लगेच त्याठिकाणी येवुन,पंच क्र.1.श्री. सचिन शिंदे यांच्याकडे लाचेच्या रकमेबाबत व अध्यक्ष श्री.श्रीराम राठोड यांचे बाबत माहीती विचारुन अध्यक्ष श्री.श्रीराम राठोड यांना सापळा पथकाने पकडले. व माझ्या कडील व्हाईस रेकर्डर बंद केला. पोलीस निरीक्षक श्री.ताटे साहेब यांनी अध्यक्ष श्री.श्रीराम राठोड यांना स्वतःची व सापळा पथकाची ओळख करुन देवुन त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री.श्रीराम सवाईराम राठोड, वय 59 वर्षे, व्यवसाय अध्यक्ष, श्री तुळजाई शिक्षण प्रसारक मंडळ अंध निवासी विद्यालय, आरटीओ ऑफीस रोड, नागेवाडी शिवार, जालना, मुळ गांव माळेगांव, ता.मंठा, जि.जालना, ह.मु.इन्कमटक्स कलनी जालना असे सांगीतले. त्यानंतर मला त्यांचे घराचे बाहेर थांबण्यास सांगीतले. त्यानंतर थोडयावेळाने मला अध्यक्ष श्री.श्रीराम राठोड यांचे घरात बोलावुन घराचे दार खिडक्या बंद करुन अल्ट्राव्हाईलेट लम्पच्या प्रकाश झोत माझ्या कपडयावर व हातावर टाकुन निरीक्षण केले असता माझे उजव्या हातावर व पँटचे उजव्या बाजुच्या खिशाचे तोंडावर व आतिल बाजुस न्थ्रासिन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर मी, पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब, सापळा पथक, दोन्ही पंच, अध्यक्ष श्री.श्रीराम राठोड असे तेथुन निघुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे आलो. सर्व घटने बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला.तरी आज दिनांक 03.11.2020 रोजी 16.00 वाजे दरम्यान श्री तुळजादेवी शिक्षक प्रसारक मंडळचे अध्यक्ष श्री.श्रीराम राठोड यांनी माझा इथुन पुढचा पगार काढण्याबाबत व मला शाळेमध्ये काम करण्यासाठी पंच साक्षीदार श्री.सचिन शिंदे यांचे समक्ष 34,500/- रु लाचेची मागणी करुन माझ्या कडुन 34,500/-रुपयाची लाच इनकम टक्स कलनी, जालना येथील त्यांचे राहते घरी स्विकारली असतांना त्यांना रंगेहात पकडण्यात आले म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

विनोद मुरलीधर राठोड

**3.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**or (किंवा)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** ~~RAVINDRA DEVIDAS NIKALJE~~ पो.नि. एस.एस ताटे, ला.प्र.वि. जालना.

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** PI **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a co given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोब नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Po Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): PRASHANT KAMLAKAR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

Scanned with CamScanner